भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.२०७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०३/०५/२०१७

१) मोटार पंपची चोरी . :—

दिनांक ०१/०५/२०१७ चे १९.०० ते ०२/०५/२०१७ चे ०४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी तुळशीराम बुधाजी पाथरीकर वय ६२ वर्ष, रा. जांभळी यांचे शेती जवळ जुमरी नाल्यावर लावलेली किर्लोस्कर कंपनीची मोटार पंप १.५ एचपी एसएल नं. एबीपीएम ०४६८ नंबरची किंमती ४,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील-तपास पोहवा. सिंदीमेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

२) घराचा मागील दाराला लावलेली साखळी काढुन लाकडी आलमारीतुन नगदी पैशाची व सोन्याचे अंगठयाची चोरी . :—

दिनांक ०१+०२/०५/२०१७ चे रात्रदरम्यान यातील फिर्यादी मोहन हरीराम वाघाये वय ४० वर्ष, रा. किन्हीमोके हे परीवारातील लोकांसह राहते घराचे छपरीत झोपले असतांना कोणीतरी अज्ञात चोराने मागील दाराला लावलेली साखळी काढुन आत प्रवेश करुन घरात ठेवलेल्या लाकडी टेबल आलमारीत असलेल्या स्टिलच्या डब्यातील नगदी ३,५००/—रु. व सुटकेस मधील २ सोन्याच्या अंगठया प्रत्येकी ५ ग्रॅम वजन १० ग्रॅम असा एकुण २३,५००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

३) घराचा मागील दाराचा कोंडा काढुन घरातील ठेवलेल्या संदुकातील नगदी पैश्याची व सोन्याच्या साहित्याची चोरी . :—

दिनांक ०१+०२/०५/२०१७ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी अशोक गोवींद बारापात्रे वय ६१ वर्ष, रा. मोखे किन्ही व त्याची पत्नी यांनी घराचे दार बंद करुन समोरील छपरीत वेगवेगळया खाटेवर झोपले असतांना कोणीतरी अज्ञात चोराने मागचे दाराचा कोंडा कोणत्यातरी वस्तुने वाकवुन घराचे आत प्रवेश करुन माजघरात असलेल्या खोलीतील लाकडी पेटीचा कोणत्यातरी वस्तुने कोंडा काढुन संदुक उघडुन संदुकात ठेवलेल्या लाल रंगाच्या बॅग मधील नगदी ८०,०००/—रु. व ३ नग सोन्याच्या अंगठया प्रत्येकी ५ ग्रॅम, १ सोन्याची एकदानी ७.५ ग्रॅम, १ सोन्याची पोत ५.५ ग्रॅम, १ सोन्याचा मंगळसुत्र पदकासह ५.५ ग्रॅम, २ जोड चांदीचे पायपट्टया चौदा तोळयाची असा एकुण १,७४,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. गायकवाड पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**<u>४) बॅटरी कॅबीनचा कुलुप तोडुन २४ बॅटरी संचाची चोरी . :–</u>**

दिनांक २०/०४/२०१७ चे १०.०० ते २८/०४/२०१७ चे १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा हरदोली येथील बिएसएनएल मोबाईल टॉवर चालु बंद का होत असते म्हणुन पाहण्यास गेला असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीने जाळी लावलेल्या सेड मागील बॅटरी कॅबीनचा कुलुप तोडुन तेथे ठेवलेल्या अमर राजा कंपनीच्या २४ बॅटरी संच किंमती ७०,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी बाबुलाल बालचंद बिसने वय ५८ वर्ष, येरली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३७९ भादवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास परीपोउपनी. जटाळ पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**<u>५) लोकसेवक पदाचा गैर वापर करुन भष्ट्र व बेकायदेशीर मार्ग अवलंबुन लाच स्विकारतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–</u>**

दिनांक ०१/०५/२०१७ चे १७.१० वा. दरम्यान यातील आरोपी क्र. १ व २ यांनी यशोदास रथन तांडेकर रा. गुरुनानक वार्ड भंडारा यांना त्याचे एस हॅपी होम रेस्ट्रारेन्ट ॲन्ड बॉर परसोडी चे चालविण्याकरीता ग्राम पंचायत परसोडी कडुन नाहरकत प्रमाणपत्र घेतले नाही त्यामुळे आम्ही तुम्हचे बिअर बार करीता लोकांचा ठराव घेवुन बार बंद करुन असे म्हणुन जर तुम्हाला ही कारवाई थांबवयाची असेल तर ३ लाख रुपयाची मागणी करुन पहीला टप्पा म्हणुन आपले लोकसेवक पदाचा गैर वापर करुन भष्ट्र व बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करुन तक्रारदार यांचे कडुन ५०,०००/–रु. लाच रक्कम स्विकारतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोनी. फाल्गुण रामदास घोडमारे एसीबी नागपुर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ७,३(१)(ड) भादवि. सहकलम १३(२) ला. प्र. का १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. फाल्गुण एसीबी नागुपर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**<u>८) अवैध दारु/जुगार अड्डयावर धाडी . :–</u>**

दिनांक ०२/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडार, करडी, आंधळगाव, साकोली, लाखनी, पालांदुर व पवनी येथे अवैध दारु/जुगार अंडयावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ९६ लिटर हा.भ.दारू किंमती ११,६५०/–रु, २२ लीटर ६८० मीली.लीटर देशी दारू. किंमती ६४९२/–रु, तसेच जुगारातुन किंमती १५२/–रु. असा एकुण किंमती १८,२९४/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.